महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, छत्रपती संभाजीनगर, आरोग्य सेवा


संपर्क:-
कार्यालय :- जिल्हा क्षयरोग केंद्र, छत्रपती संभाजीनगर
ईमेल :-dtomhabd@rntcp.org
दुरध्वनी : ०२४०-२९९३१४०

पत्ता:- जिल्हा क्षयरोग अधिकारी,
जिल्हा क्षयरोग केंद्र, छत्रपती संभाजीनगर
आमखास मैदान,व्हि.आय.पी.रोड,
छत्रपती संभाजीनगर पिन.४३१००३.

डॉ. वैशाली डकले पाटील
जिल्हा क्षयरोग अधिकारी, छत्रपती संभाजीनगर


जा.क्र.- एनटीईपी/ क्ष-किरण तंत्रज्ञ /दरपत्रके/ 993 /२०२५
दिनांक ०१/१०/२०२५

## जाहीर नोटीस

विषय : - क्ष-किरण तंत्रज्ञांची सेवा "ऑन कॉल" बेसिसवर बाह्य संस्थेमार्फत घेण्याकरिता दरपत्रके मागविण्याबाबत.....
संदर्भ : - मा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांची मान्यता दिनांक ०६/०३/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिण्यान्वे सन २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत एफएमआर कोड ७५.३ आउटसोर्सिंग ऑफ लॅब सर्विसेस या लेखाशिर्षकांतर्गत प्राप्त निधीच्या अधीन राहून या कार्यालयास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात डिजिटल हॅड हेल्ड एक्स-रे यंत्राच्या सहाय्याने संशयित क्षयरुग्णांची तपासणी करण्यासाठी सक्षम व पात्र क्ष-किरण तंत्रज्ञांची सेवा "ऑन कॉल" बेसिसवर बाह्य संस्थेमार्फत घेण्यात येणार आहे. या सेवेसाठी पात्र संस्थांकडून सीलबंद दरपत्रके (Quotations) खालीलप्रमाणे मागविण्यात येत आहेत.

| अ.क्रमांक | तपशील | दर |
|---|---|---|
| १ | • सेवा कालावधी: "ऑन कॉल" बेसिसवर दरमहा कमीत कमी २० दिवस<br>• सेवा क्षेत्र: छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध ग्रामीण भाग<br>• दररोज ८ ते १२ तास कार्य वेळ<br>क्ष-किरण तंत्रज्ञांची आवश्यक शैक्षणिक पात्रता<br>१) मॅट्रिक्युलेशन/एचएससी (१०+०२) मान्यताप्राप्त संस्था/बोर्ड कडून विज्ञान पदवी आणि,<br>२) तांत्रिक पात्रता: बी.एस्सी. (मेडिकल रेडिओलॉजी टेक्नॉलॉजी किंवा रेडिओलॉजीमध्ये डिप्लोमा) किंवा एक्स-रेमध्ये डिप्लोमा. | "ऑन कॉल" बेसिसवर प्रति दिवस / दरमहा |

अटी व शर्ती:

- सेवा फक्त योग्य शैक्षणिक पात्रता असलेल्या आणि जिल्हा क्षयरोग केंद्रात क्ष-किरण तंत्रज्ञ म्हणून कामाचा अनुभव असलेल्या उमेदवाराला संस्थेने प्राधान्य देऊन क्ष-किरण तंत्रज्ञांची सेवा पुरविण्यात यावी.
- तंत्रज्ञाकडे मान्यताप्राप्त संस्थेचा एक्स-रे टेक्निशियन कोर्सचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- सर्व आवश्यक कागदपत्रे (पात्रता, अनुभव, नोंदणी क्रमांक) दरपत्रकासोबत जोडावीत.
- दरामध्ये तंत्रज्ञाचे मानधन, प्रवास खर्च, आणि इतर सर्व कर समाविष्ट असावा.
- सेवा दिलेल्या दिवसाचे लॉगशीट व कामाचा अहवाल सादर करणे आवश्यक राहील.
- शासकीय कामाच्या अनुभव असलेल्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.
- संस्थेने दिलेल्या वेळापत्रकानुसार व ठिकाणांनुसार सेवा देणे बंधनकारक राहील.
- निवड प्रक्रियेसाठी संस्थेचा निर्णय अंतिम राहील.
- अधिसूचित वेळेत सेवा देण्यात अयशस्वी ठरल्यास योग्य दंडात्मक कारवाई केली जाईल.
- संस्थेला कोणतीही सूचना न देता दरपत्रके रद्द, फेटाळण्याचा अथवा बदल करण्याचा संपूर्ण अधिकार राहील.

**दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख: ०९/१०/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत**
**सादर करण्याचे ठिकाण: जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, छत्रपती संभाजीनगर**

डॉ वैशाली डकले पाटील
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र छत्रपती संभाजीनगर